पुढारी

# इंटरनेट सुरक्षा काळाची गरज : सपोनि कांबळे

## पेठ येथे महाडिक अभियांत्रिकीत 'क्विक हिल' अंतर्गत कार्यशाळा



**इस्लामपूर : विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करताना सहायक पोलिस निरीक्षक गजानन कांबळे.**

**इस्लामपूर : वार्ताहर**

श्री व्यंकटेश्वरा शिक्षण संस्था संचलित नानासाहेब महाडिक अभियांत्रिकी महाविद्यालय व क्विक हिल पुणे यांच्यामध्ये सामंजस्य करार झाला. यावेळी संस्थेचे सचिव राहुल महाडिक उपस्थित होते.

यावेळी सायबर सिक्युरिटी अवेअरनेस या विषयावर कार्यशाळा झाली. सहाय्यक पोलिस निरीक्षक गजानन कांबळे, क्विक हिल पुणेच्या श्रीमती सुगंधा दाणी, संस्थेचे कार्यकारी संचालक प्रा. महेश जोशी, प्राचार्य डॉ. व्ही. ए. कुलकर्णी उपस्थित होते.

सांगली सायबर सेलचे सहाय्यक पोलिस निरीक्षक गजानन कांबळे यांनी सायबर गुन्हे, पार्श्वभूमी व आवश्यक काळजी यांवर मार्गदर्शन केले. प्राचार्य जोशी म्हणाले, गुणवत्तापूर्ण तंत्रशिक्षणाबरोबरच विविध नामांकित कंपन्यांशी महाविद्यालयाचा करार झाला आहे. प्राचार्य डॉ. व्ही. ए. कुलकर्णी यांनीही मार्गदर्शन केले.

विभागप्रमुख प्रा. इम्रान इनामदार यांच्यासह विद्यार्थ्यांनी संयोजन केले.